Radhabai Kale Mahila Mahavidyalaya Ahmednagar-414001

## — अंतरंग —


| अ.क्र. | संशोधन पत्रिकेचा विषय | लेखकाचे नाव | पान क्र. |
|---|---|---|---|
| १. | 'झिम् पोरी झिम्' कादंबरीतील स्त्रीवादी जाणीवा | डॉ. प्रकाश दुकळे | १ |
| २. | मराठी नाटकांतील स्त्रीवादी विचार | डॉ. दत्ता पाटील | ५ |
| ३. | जागतिकीकरणाचा स्त्रीवादी साहित्यावर प्रभाव | डॉ. अनिल प्र.उबाळे | ११ |
| ४. | लोकसाहित्यातून उमटलेले स्त्री चित्रण | डॉ. दत्तात्रय मारुती कारंडे | १६ |
| ५. | सर्वोत्तम भूमिपुत्र : गोतम बुध्द या ग्रंथातील काही बौध्द स्त्रीव्यक्तिरेखा | डॉ. प्रशांत गायकवाड | २४ |
| ६. | लोकसाहित्यातून उमटलेले स्त्री-चित्रण | डॉ. रत्नप्रभा काशिनाथ पगारे | ३० |
| ७. | मुस्लीम कादंबरीकारांच्या कादंबऱ्यातील मुस्लिम स्त्रिया | डॉ. आर. के. शानेदिवाण | ३५ |
| ८. | लोकसाहित्यातूल उमटलेले स्त्री चित्रण | डॉ. कुडलिक चिंधू पारधी | ४० |
| ९. | संत जनाबाईच्या काव्यातून प्रकट होणारे स्त्रीमन | प्रा. बाळासाहेब संतू चव्हाण | ४४ |
| १०. | रेव्ह धर्माजी काळे यांच्या शाहिरीतील ख्रिस्ती स्त्रीचे चित्रण | प्रा. अविनाश भोरे | ४६ |
| ११. | भारतीय समाजातील स्त्री मानसिकता आणि मराठी साहित्यातील स्त्री मानसिकतेचे दर्शन यांचा चिकित्सक अभ्यास | डॉ. सुरेश बाळ कृष्ण शिंदे | ५० |
| १२. | थेरीगाथा पालि वाङ्मयातील एक स्त्रीवादी साहित्य | विजयकुमार झुंबरे | ५५ |
| १३. | भोंडल्याच्या गाण्यातील स्त्रियांचे सांसारीक जीवन | डॉ. माधुरी गोपाळ तानवडे | ६१ |
| १४. | स्त्री वेदनेचा हुंकार: रानआसवांचे तळे | प्रा. चिंतामण धिंदळे | ६७ |
| १५. | लोकसाहित्यातून उमटलेले स्त्री चित्रण | विलीना शशांक इनामदार | ७२ |
| १६. | कविता महाजन यांच्या 'ब्र' कादंबरीतील स्त्रीवाद | डॉ. जे. पी. चंदनशिवे | ७८ |
| १७. | स्त्रीवाद आणि मराठी साहित्य | डॉ. भारती रेवडकर | ८१ |




Scanned with OKEN Scanner

# स्त्री वेदनेचा हुंकार: रानआसवांचे तळे

चिंतामण धिंदळे
मराठी विभाग प्रमुख, राधाबाई काळे महिला महाविद्यालय, अहमदनगर

Radhabai Kale Mahila Mahavidyalaya Ahmednagar-414001

'आदिवासी साहित्य हे वनसंस्कृतीचे नातलग साहित्य होय.आदिवासी साहित्य हे रानावनातील वंचितांचे साहित्य होय.ज्यांच्या प्रश्नांना भुतकाळाने कधी उतरच दिले नाही,अशा दुर्लक्षितांचे हे साहित्य आहे.ज्यांच्या आक्रोशाला इथल्या सावत्र समाजव्यवस्थेने कधी न्यायचं दिला नाही,अशा गिरीकुहरातील अन्यायग्रस्तांचे ते क्रांती साहित्य होय'.असे विनायक तुमराम आपल्या 'आदिवासी साहित्य-दिशा आणि दर्शन' या समीक्षा ग्रंथात उल्लेख करतात.आदिवासी साहित्याकडे नागर जणांनी नेहमीच तिरकस नजरेने पाहिले आहे.अर्धनग्न,अशिक्षित,रानटी लोकांचे काही साहित्य असते का ? असा विचार प्रस्तापित साहित्यातून पुढे येत असतांना ६०-७० च्या दशकात शिकलेल्या आदिवासी तरुणानी आपले काही म्हणून लेखन सुरु केले,आम्ही जरी जंगल,दऱ्या,खोऱ्यात राहत असलो,अर्धनग्न कपड्यात वावरत असलो तरी आम्हीही माणसे आहोत.तुमच्या सारख्याच आमच्याही गरजा आहेत,आम्हीही या देशाचे नागरिक आहोत.असा सूर साधारणतः ६०-७० च्या दशकात लिहिलेल्या आदिवासी साहित्यात आपणास दिसतो.आदिवासी संस्कृती एक स्वतंत्र संस्कृती आहे.

महाराष्ट्रात आजमितीस ४५ आदिवासी जमाती आहेत.आदिवासी आता कुठे शिक्षणाच्या प्रवाहात आला आहे.आश्रमशाळा,वस्तीशाळा,जि.प.शाळा, काही प्रमाणात मिशनऱ्याच्या शाळेच्या माध्यमातून आदिवासी शिकू लागला. स्वातंत्र्यानंतर आदिवासी साहित्य मराठी साहित्यात दाखल झाले. ६० च्या दशकाच्या आसपास आदिवासी साहित्यातून आदिवासी जीवन, दुःख, दारिद्र्य, शोषण अत्याचार आणि निसर्ग चित्रण मोठ्या प्रमाणात आल्याचे दिसते.साधारणतः २००० नंतर आदिवासी साहित्यात जागतिकीकरण,आदिवासी धर्मकल्पना, आदिवासीच्या चळवळी आणि एकूणच आदिवासीकरणाची जाणीव या साहित्यातून प्रामुख्याने आल्याचे दिसते. कथा, कादंबरी, नाटक, ललित या साहित्य प्रकारांपेक्षा 'कविता' हा साहित्य प्रकार अधिक जोमाने विस्तारल्याचे दिसते. आदिवासी साहित्याच्या मूळ प्रेरणा ह्या निसर्ग आहेत. निसर्गाच्या सान्निध्यात, सहवासात राहणाऱ्या आदिवासींनी आपल्या लोकगीतातून, नृत्यातून आपली संस्कृती आणि जगणे नेमकेपनाने जपली आहे. हे आपणास त्यांच्या लोकसाहित्यातून अभ्यासता येते. आदिवासी कवितेचा बारकाव्याने अभ्यास करता,असे लक्षात येते की मराठी कवितेतील प्रेरणा आणि आदिवासी कवितेतील प्रेरणा यात साम्य नाही. मराठी साहित्यात 'माणूस' हा मध्यवर्ती घटक असून आदिवासी साहित्यात 'निसर्ग' आणि 'माणूस' यांचा समन्वय नेमका कसा साधला आहे, याचे मर्म उलगडते. निसर्गातील प्रेरणा मानवी जीवनात कशा पूरक आहेत, नव्हे निसर्ग हाच माणसाचा कसा 'गुरु' आहे.हे आपणास त्यांच्या साहित्यातून प्रकर्षाने जाणवते.आदिवासी कवितेतून आलेल्या निसर्ग प्रतिमा, जीवन जाणिवांचा अभ्यास करता येईल. २१ व्या शतकात आदिवासी कवितेत आलेल्या स्त्रीयांच्या जीवन जाणिवांचा परामर्श या शोधनिबंधातून घेण्याचा प्रयत्न केला आहे.



Scanned with OKEN Scanner